# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १५४
## सभावृत्तांत

दिनांक- १७.०२.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा बुधवार दिनांक १७.०२.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
३. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
४. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
५. मा.कदम निर्मला सद्‌गुरु
६. मा.अशोक दशरथ सोनवणे
७. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
८. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
९. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
१०. मा.रामदास तानाजी कुंभार
११. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
१२. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
१३. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख,मा.गायकवाड,मा.मुंढे,मा.कारचे, मा.फडणीस-सहा.आयुक्त, मा.राजदेरकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता, मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता,मा.पाटील-उपसंचालक (नगररचना),मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्य. अधिकारी, मा.लोंढे- मुख्यलेखापाल, मा.सूर्यवंशी-कायदा सल्लागार, मा.कुदळे, मा.निकम, मा.कपिले,मा.महाडीक,मा.थोरात,मा.बनकर,मा.जाधव,मा.चव्हाण-कार्य.अभियंता, मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-**

विषय क्रमांक :-५०) नाशिक फाटा जंक्शन येथे नदी,रेल्वे व महामार्ग इ. ना ओलांडणारा पूल बांधणेबाबत...

विषय क्रमांक :-५१) रोटरडॅम, नेदरलँड येथील परदेश दौऱ्यास व होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक :-५२) ठरावामध्ये दुरुस्ती करणेबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.गणेश भोंडवे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-५३) रोड स्वीपरच्या कामाबाबत-मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-५४) जेटिंग गाड्याबाबत-मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-५५) जागतिक महिला दिनाबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-५६) तरतूद वर्ग करणेबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-५७) मानधनावर घेणेबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-५८) शाळा बांधणेबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-५९) बँक गॅरंटीबाबत- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६०) वाहन भाड्याने घेणेबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६१) सुरक्षा व्यवस्थेबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६२) जागतिक महिला दिनाबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६३) जागा भाड्याने देणेबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६४) हॉल भाड्याने देणेबाबत- मा.जितेंद्र ननावरे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६५) सॉफ्टवेअर बाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६६) जागतिक महिला दिनाबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६७) मानधनावर मुदतवाढ देणेबाबत-मा.जितेंद्र ननावरे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६८) जीवरक्षक पुरविणेबाबत-मा.प्रशांत शितोळे, मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-६९) ठरावात दुरुस्तीबाबत-मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

--------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक :- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा.जितेंद्र ननावरे

पुणे येथील जर्मन बेकरीतील बॉम्बस्फोटाचा निषेध करुन तसेच त्यात मृत पावलेल्या व्यक्तींस श्रद्धांजली वाहून गुरुवार दि.१८/२/२०१० रोजी दु.४.०० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.)

मा.सभापती :- पुणे येथील जर्मन बेकरीतील बॉम्बस्फोटाचा निषेध करणेत येत आहे. गुरुवार दिनांक १८/०२/२०१० रोजी दुपारी ४.०० वा.पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १५४
## सभावृत्तांत
## (दि.१७.२.२०१० ची तहकूब सभा)

दिनांक- १८.०२.२०१० वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.१७.०२.२०१० ची तहकूब सभा गुरुवार दिनांक १८.०२.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.भोंडवे गणेश तुकाराम
३. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
४. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
५. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
६. मा.कदम निर्मला सद्‌गुरु
७. मा.अशोक दशरथ सोनवणे
८. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
९. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
१०. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
११. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
१२. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
१३. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.फडणीस,मा.गायकवाड,मा.कारचे-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव,मा.उगिले-शहर अभियंता, मा.सावळे-अति. अधिक्षक अभियंता,मा.पाटील-उपसंचालक (नगररचना),मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.सुर्यवंशी-कायदा सल्लागार,मा.कांबळे,मा.निकम,मा.थोरात,मा.बनकर,मा.कुदळे,मा.जाधव,मा.कपिले, मा.जाधव,मा.चिंचवडे-कार्य. अभियंता,मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.फुगे-मुख्य आयातकर अधिक्षक,मा.पवार-प्रशासन अधिकारी,मा.गावडे-अग्निशामक अधिकारी, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

अ) दिनांक २.२.२०१० व ५.२.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ९.२.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे विषय क्रमांक १,४,५,६,७,८,९,१०, ११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२, ३४,३५,३७,३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१,५२,५३,५४,५५,५६,५ ७,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६,६७,६८,६९,२,३,३३,३६ या क्रमाने कामकाजाच्या बाबी विचारार्थ घेणेत येतील असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---

ठराव क्रमांक- १०६३८ विषय क्रमांक- १
दिनांक- १८.२.२०१० विभाग- कायदा
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कास/३/कावि/६६/२०१०दि.२७/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

दरखास्त क्र.१७३/२००९ प्रकरणी मे.राजमाता एंटरप्रायझेस यांचे नावे र.रू. ६,५१,०००/- चा धनादेश उमेद मान्यतेवर मे.कोर्टासमक्ष अदा करण्यात आलेला असल्याने मे.कोर्टात अदा केलेल्या र.रू.६,५१,०००/- [र.रू.सहा लाख एक्कावन्न हजार] चे अदायगीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६३९ विषय क्रमांक- ४
दिनांक- १८.२.२०१० विभाग- वाय.सी.एम.एच.
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/१अ/कावि/२१/२०१० दि.२८/१/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

तालेरा रूग्णालयीन व परिसरातील डास, माशा, उंदीर, ढेकूण व तत्सम प्रादुर्भाव कमी करणेकामी M/s.G.T.Pest Control Co. यांचे मंजूर दरानुसार येणाऱ्या र.रू.८२,५००/- [र.रू. ब्याऐंशी हजार पाचशे] चे खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६४० विषय क्रमांक- ५
दिनांक- १८.२.२०१० विभाग- विद्युत अ प्रभाग
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जा.क्र.अप्र/वि/आ/३४/१० दि.४/२/२०१०

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या अ प्रभाग विद्युत विभाग कार्यक्षेत्रा अंतर्गत काळभोरनगर शाळा परीसरातील स्ट्रिटलाईट करीता वीज पुरवठ्याचे वीजमीटर करीता म.रा.वि.वि.कंपनीस र.रू. ३,८५४/- अदा करणे आवश्यक असल्याने सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६४१ विषय क्रमांक- ६
दिनांक- १८.२.२०१० विभाग- क प्रभाग
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/नि.क/१५/कावि/३४/१०दि.२/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.८ अन्वये, दापोडी वॉर्ड क्र.१०३ मध्ये वितरण व्यवस्थेत किरकोळ दुरुस्ती व सुधारणा करणेकामी मे.जी.आर. मंगोडेकर (नि.र.रू.४,६१,९५५/- [र.रू.चार लाख एकसष्ठ हजार नऊशे पंचावन्न] पेक्षा २८.२० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६४२ विषय क्रमांक- ७
दिनांक- १८.२.२०१० विभाग- क प्रभाग
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/नि.क/१५/कावि/३६/१०दि.२/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.९ अन्वये, दापोडी वॉर्ड क्र.१०४ मध्ये वितरण व्यवस्थेत किरकोळ दुरुस्ती व सुधारणा करणेकामी मे.जी.आर. मंगोडेकर (नि.र.रू.४,६४,०००/- [र.रू.चार लाख चौसष्ठ हजार] पेक्षा २८.२० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६४३ विषय क्रमांक- ८
दिनांक- १८.२.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/८/२९/१०दि.४/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/०९-१० मधील अ.क्र.२२ अन्वये, चिंचवड वॉर्ड क्र.६३ मध्ये ठिकठिकाणी रस्त्यावरील ट्रेंचेसची दुरुस्ती करणेकामी मे.एन.एन.शिंगाडे (नि.र.रू.४,१९,९५०/- [र.रू.चार लाख एकोणीस हजार नऊशे पन्नास] पेक्षा ३८.५० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६४४ विषय क्रमांक- ९
दिनांक- १८.२.२०१० विभाग-ब प्रभाग
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/८/३०/१०दि.४/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.२९ अन्वये, चिंचवड वॉर्ड क्र.६४ भाजी मार्केट जवळील मच्छी मार्केटचा विस्तार करणेकामी मे.आर.जी. मंगळवेढेकर (नि.र.रू.६,९८,२५०/- [र.रू.सहा लाख अठ्ठ्यान्नव हजार दोनशे पन्नास] पेक्षा २७ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६४५ विषय क्रमांक- १०
दिनांक- १८.२.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/८/३१/१०दि.४/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.५० अन्वये, चिंचवड वॉर्ड क्र.६७ गोलांडे गार्डन येथे आरोग्य निरिक्षक कार्यालय बांधणेकामी मे.बी.जे. कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२,७९,३००/- [र.रू.दोन लाख एकोणऐंशी हजार तीनशे] पेक्षा २०.७५ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १०६४६ विषय क्रमांक- ११
दिनांक- १८.२.२०१० विभाग- विद्युत मुख्य कार्यालय
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जा.क्र.विद्युत/नि/१/कावि/२७/१० दि.५/२/२०१०

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत विभागा कडील नि.नो.क्र.२/०९-१० मधील अ.क्र.५ अन्वये, YCMH येथील कॅथलॅबकरिता बसविलेल्या UPS जोडणीकरिता पॅनल बसविणेकामी मे.ओमकार इंजिनियरिंग (नि.र.रू.४,९९,३७१/- [र.रू.चार लाख नव्यान्नव हजार तीनशे एक्काहत्तर] पेक्षा २४.५५ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६४७ विषय क्रमांक- १२
दिनांक- १८.२.२०१० विभाग-विद्युत मुख्य कार्यालय
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जा.क्र.विद्युत/नि/१/कावि/२६/१० दि.५/२/२०१०

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत विभागा कडील नि.नो.क्र.२/०९-१० मधील अ.क्र.४ अन्वये, उर्जाबचत योजने अंतर्गत YCM हॉस्पीटल वातानुकुलन यंत्रणेचे कुलींग टॉवर बदलणेकामी मे.आनंद रेफ्रिजरेशन & इले. (नि.र.रू.५,२५,७५०/- [र.रू.पाच लाख पंचवीस हजार सातशे पन्नास] पेक्षा ३ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६४८ विषय क्रमांक- १३
दिनांक- १८.२.२०१० विभाग- भूमि आणि जिंदगी
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजिं/५/कावि/४६/१० दि.५/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

श्री.फारूक रज्जाक कुरेशी यांनी गाळा क्र.४० साठी मनपा भाडेदर र.रू.१,७६३/- प्र.महा (मनपा कर व विद्युत बिला व्यति.) देवू केलेला आहे सदर गाळ्याचे क्षेत्र ३.७५ चौ.मी. आहे श्री.कुरेशी यांनी दिलेला दर हा मनपा दरा एवढाच आहे परंतू सदरच्या गाळ्यांना अल्प प्रतिसाद लाभला असल्याने सदरचा दर स्वीकृत करून निविदा अटी / शर्तीनुसार मनपा करेत्तर समिती शिफारशीनुसार दुसरे

वर्षापासून प्रत्येक वर्षी भाडेदरात १२.५ % वाढ करून निविदा स्वीकृत करून ५ वर्षाचे भाडेकराराने देण्याचे प्रस्तावीत असल्याने श्री.फारूक रज्जाक कुरेशी यांची पिंपरी बिफ मार्केट गाळा क्र.४० साठीची निविदा स्विकृतीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६४९ विषय क्रमांक- १४
दिनांक- १८.२.२०१० विभाग-अग्निशामक
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अग्नि/१/कावि/३१/१० दि.४/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मा.महापालिका सभा ठराव क्र.५३४० दि.२०/११/२००४ अन्वये लागू करणेत आलेल्या अग्निशमन सेवा शुल्कांमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करून घेणे व नवीन बाबींवर अग्निशमन सेवाशुल्क दरवाढ आकारणे यासाठी प्रस्तावा सोबतच्या सुचीप्रमाणे मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६५० विषय क्रमांक- १५
दिनांक- १८.२.२०१० विभाग-नगरसचिव
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नस/५/कावि/२१३/१० दि.५/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

शासन निर्णयाप्रमाणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सदस्यांना मानधन दरमहा र.रू.७,५००/- [प्रति बैठक भत्ता-१००/- (कमाल मर्यादा रू.४००/- दरमहा) (शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२००४/४६८/प्र.क्र.८४/०४/नवि-२०, दिनांक २४ जानेवारी २००५ मध्ये नमुद दराप्रमाणे] दिनांक २२ जानेवारी २०१० पासुन दरमहा अदा करणेकामी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६५१ विषय क्रमांक- १६
दिनांक- १८.२.२०१० विभाग-स्थापत्य
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/३५६/१०दि.६/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.३७ अन्वये, आकुर्डी प्रभाग क्र.२१ येथील मनपाच्या इमारतीची किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.ओमकार एंटरप्रायजेस (नि.र.रू.११,९०,४२४/- [र.रू.अकरा लाख

नव्वद हजार चारशे चोवीस] पेक्षा ३४.३३ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.७,८१,७५१/- [र.रू.सात लाख एक्याऐंशी हजार सातशे एक्कावन्न] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६५२ विषय क्रमांक- १७

दिनांक- १८.२.२०१०

सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे

संदर्भ:-१) मा.विजया जाधव,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/२/२०१० ठराव क्र.२६

मनपाचे १० नंबर उद्यान, शाहू महाराज यांचे पुतळ्यामागे मोरवाडी येथील स्क्वॅश कोर्ट व व्यायामशाळा सध्या मनपा मार्फत चालविले जात असून कर्तव्य फाऊंडेशन, चिंचवड, पुणे-३३ ही संस्था दरमहा र.रू.१०,०००/- मनपाकडून सेवाशुल्क घेऊन, ५ वर्षे कराराने चालविणेस घेणेस इच्छुक असल्याने मनपाचे १० नंबर उद्यान, शाहू महाराज यांचे पुतळ्यामागे मोरवाडी येथील स्क्वॅश कोर्ट व व्यायामशाळा हे कर्तव्य फाऊंडेशन, चिंचवड, पुणे-३३ या संस्थेस दरमहा र.रू.१०,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन ५ वर्षे कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६५३ विषय क्रमांक- १८

दिनांक- १८.२.२०१०

सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे

संदर्भ:-१) मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/२/२०१० ठराव क्र.२७

श्री.संत ज्ञानेश्वरनगरी म्हाडा येथील भुखंड क्षेत्र ३३६९.१३ चौ.मी. पुणे गृहनिर्माण महामंडळ (म्हाडा) कडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे विकसीत करणेसाठी हस्तांतर केले असून सदर भुखंडावर विविध खेळांचे क्रीडा सरावासाठी मैदान व्यायामशाळा तयार करण्याचे नियोजन असल्याने श्री.संत ज्ञानेश्वरनगरी म्हाडा येथील भुखंड क्षेत्र ३३६९.१३ चौ.मी. पुणे गृहनिर्माण महामंडळ (म्हाडा) कडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे विकसीत करणेसाठी हस्तांतर केल्याने, क्रीडा मैदाने व व्यायामशाळा तयार करणेकामी ब प्रभागांतर्गत सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रकात र.रू. २५,००,०००/- ची तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १०६५४ विषय क्रमांक- १९
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-१) मा.एकनाथ थोरात,मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव...
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/२/२०१० ठराव क्र.२८

मा.क्रीडा समिती मार्फत मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१०४५१ दि.२७/१/१० अन्वये महापौर चषक ७ विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी र.रू. १४,७८,५५०/- चे खर्चास मान्यता दिलेली असून यामध्ये महापौर चषक जिल्हास्तर हॉकी स्पर्धेचा समावेश असल्याने शुटींग व्हॉलीबॉल जिल्हास्तर स्पर्धा आयोजित करणेऐवजी जिल्हास्तर हॉकी स्पर्धा मा.स्थायी समितीचे ठरावाप्रमाणे आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१०६५५ विषय क्रमांक- २०
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-१) मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/२/२०१० ठराव क्र.२९

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची पिंपरीगांवातील मृनाल गार्डन शेजारील वॉर्ड क्र.७४ येथील बॉक्सिग हॉल, व्यायामशाळा ही व्यायामशाळा ५ (पाच) वर्षे कालावधीसाठी दरमहा सेवाशुल्क र.रू.२,०००/- च्या (बॉक्सिग हॉल व व्यायामशाळा) भाडेतत्वावर अमर कापसे युवा मंच पिंपरी चिंचवड या संस्थेस मनपाच्या अटी शर्तीनुसार चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१०६५६ विषय क्रमांक- २१
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-१) मा.सुमनताई पवळे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/२/२०१० ठराव क्र.३०

मनपाच्या व्यायामशाळांकरिता (१७) व्यायाम साहित्य पुरविणेकामी र.रू. २४,८०,०५३/- चे कामाचे आदेश मे.गिनिज स्पोर्टस, पुणे-२६ यांना दिले होते. मे.गिनिज स्पोर्टस यांनी फेब्रु.०९ ते ऑक्टोंबर ०९ या काळात एकूण १० व्यायामशाळांकरीता एकूण र.रू.१६ लाखाचे साहित्य पुरविले आहे. इतरही व्यायामशाळांत व्यायाम साहित्य तयार करण्याचे कामकाज त्यांचेमार्फत चालू होते. परंतू व्यायाम साहित्य विहित वेळेत न पुरविल्याने मा.आयुक्त यांनी आदेश क्र.

क्रिडा/८/कावि/५६३/२००९ दि.२८/१०/०९ अन्वये मनपाचे व्यायामशाळांकरीता व्यायाम साहित्य पुरविणेकामी कामाचे आदेश देऊनही व्यायामसाहित्य वेळेत न पुरविले बाबत अनामत रक्कम जप्त करून कामाचे आदेश रद्द करण्याची कारवाई केली आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. क्रिडा/५/कावि/३५८/२००९ दि.१९/११/०९ अन्वये नि.नो.क्र.४/२००८-०९ कुस्ती मॅट वेळेत न पुरविलेबाबत व नि.नो.क्र.३/२००७-०८ व्यायामशाळेकरीता व्यायाम साहित्य वेळेत न पुरविलेबाबत मे.गिनिज स्पोर्टस पुणे-२६ यांना पुढील ३ वर्षे कालावधीसाठी कामाची निविदा न देणेच्या कारवाई करणेस व निविदा भरणेस अपात्र समजणेस ही कारवाई केली आहे. मे.गिनिज स्पोर्टस यांनी क्रीडा विभागाकडे विनंती अर्ज केला असून ते १५ मार्च २०१० पर्यंत उर्वरित व्यायाम साहित्य पुरविण्याचे मान्य केले आहे. तरी वरील सर्व परिस्थितीचा विचार करून मे.गिनिज स्पोर्टस यांना एकवेळ संधी देऊन त्यांचेवर १) आदेश क्र.क्रिडा/७/कावि/५६३/२००९ दि.२८/१०/०९ २) आदेश क्र. क्रिडा/५/कावि/३५८/२००९ दि.१९/११/०९ अन्वये केलेली कारवाई स्थगित, रद्द करून त्यांना दिलेल्या कामाचे आदेशातील उर्वरीत व्यायाम साहित्य मनपा व्यायामशाळांकरीता पुरविणेस मुदतवाढ देऊन व्यायामसाहित्य पुरविण्याची परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६५७ विषय क्रमांक- २२
दिनांक- १८.२.२०१० विभाग- आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आ/२/कावि/६३/२०१० दि.६/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

श्री.सचिन युवराज खंडागळे, कॉम्प्युटर ऑपरेटर यांची कामाची मुदत संपत असल्यामुळे तथापी कामाचा होणारा खोळंबा विचारात घेता त्यांस हंगामी स्वरूपात कॉम्प्युटर ऑपरेटर पदावर र.रू.५,०००/- [र.रू.पाच हजार] एकवट प्रतिमहा मानधनावर दि.२६/२/२०१० पासून सहा महिने कालावधीसाठी नियुक्त करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६५८ विषय क्रमांक- २३
दिनांक- १८.२.२०१० विभाग-वैद्यकीय मुख्य कार्यालय
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१/कावि/१३९/१० दि.६/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपा कार्यक्षेत्रात चिखली, किवळे, दिघी, पुनावळे, चऱ्होली, बोपखेल या ठिकाणी नव्याने प्रस्तावित दवाखान्यांसाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे निवड यादी व

प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना प्रतिमहा  र.रू.३,०००/- [र.रू.तीन हजार] एकत्रित मानधनावर ६-६ महिने कालावधीसाठी [वॉर्डबॉय] नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६५९ विषय क्रमांक- २४
दिनांक- १८.२.२०१० विभाग- क प्रभाग
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भः-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/नि.क/१५/कावि/३८/१० दि.४/२/२०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.१३ अन्वये, वॉर्ड क्र.१०० व १०१ मधील जुने बोअरवेल दुरुस्त करणेकामी मे.जी.आर.मंगोडेकर (नि.र.रू. ४,६५,९१९/- [र.रू.चार लाख पासष्ठ हजार नऊशे एकोणीस] पेक्षा १९ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६६० विषय क्रमांक- २५
दिनांक- १८.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भः-मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२५/१० दि.८/२/२०१०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/२००७-०८ मधील अ.क्र.६९ अन्वये, प्रभाग क्र.१३ पिंपळेगुरव येथील पवना नदी वरील कासारवाडी पुलाजवळील घाटाचे विस्तारीकरण करणे कामी मे.श्री.साईकृपा कंन्स्ट्रक्शन (नि.र.रू.७,९९,३९२/- [र.रू. सात लाख नव्यान्नव हजार तीनशे ब्यान्नव] पेक्षा १० % जास्त) या ठेकेदाराबरोबर निविदा अटी नुसार निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून करारनामा करून घेऊन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६६१ विषय क्रमांक- २६
दिनांक- १८.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/३६६/१० दि.८/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.५ अन्वये, चिखली येथील पेठ क्र.२० मध्ये शाळेसाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर शाळा इमारत बांधणेकामी मे.यशक असोसिएट्स (नि.र.रू.५८,१०,६१५/- [र.रू.अठ्ठावन्न लाख दहा हजार सहाशे पंधरा] पेक्षा १०.९७ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.५१,७३,१९१/- [र.रू. एक्कावन्न लाख त्र्याहत्तर हजार एकशे एक्यान्नव] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६६२ विषय क्रमांक- २७
दिनांक- १८.२.२०१० विभाग- विद्युत मुख्यालय
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.वि/मुका/४६९/१० दि.६/२/२०१०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपा प्रशासन इमारती मधील विद्युत व्यवस्थेची सन २००९-१० करीताची निरिक्षण फी र.रू.१७,२००/- [र.रू.सतरा हजार दोनशे] मा.विद्युत निरिक्षक, पुणे यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६६३ विषय क्रमांक- २८
दिनांक- १८.२.२०१० विभाग- आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/३/कावि/८२/१० दि.६/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० अन्वये, अ प्रभाग कार्यक्षेत्रातील हॉटेल/कॅन्टींगवेस्ट गोळा करणे व वाहतुक करणेकामी मे.विराज ट्रान्सपोर्ट [निविदा रकमेच्या १८.५७ % कमी प्रति वाहन प्रती दिन र.रू. १,५३९/- एकुण र.रू.११,२३,४९०/- [र.रू.अकरा लाख तेवीस हजार चारशे नव्वद] ] यांचेशी

कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. (नि.र.रू.१३,७९,७००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६६४ विषय क्रमांक- २९
दिनांक- १८.२.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/९/कावि/११९/१० दि.६/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

३ नग हॉय बॅक एक्झीक्युटीव चेअर पुरविणेकामी कोटेशन पध्दतीने दरपत्रक मागविण्यात आलेली असून प्राप्त ३ कोटेशन मध्ये मे.श्री.संत फर्निचर, सिंहगड रोड, पुणे यांचे दर लघुत्तम असल्याने त्यांचेकडून ३ नग हॉय बॅक एक्झीक्युटीव चेअर लघुत्तम दराने खरेदी करणेस व येणाऱ्या एकूण र.रू.४८,५२५/- [र.रू. आठ्ठेचाळीस हजार पाचशे पंचवीस] खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६६५ विषय क्रमांक- ३०
दिनांक- १८.२.२०१० विभाग- संगणक
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/८/कावि/५५/१० दि.६/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

SMS receive करणेबाबतच्या Shortcode बाबतचे कामकाज मे.Tech ९ Services यांचेमार्फत स्वतंत्र Short code ५४२४२ ची वार्षिक र.रू.३०,०००/- आणि Onetime Setup र.रू.५,०००/- असे एकूण र.रू.३५,०००/- इतक्या रकमेस (करारनामा न करता) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६६६ विषय क्रमांक- ३१
दिनांक- १८.२.२०१० विभाग- नगररचना व विकास
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/४अ१/४२/१० दि.२/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

विशेष भुमि संपादन अधिकारी यांचे कार्यालयीन सोयी सुविधांसाठी र.रू.१० लाख चा निधी उपलब्ध करून देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६६७ विषय क्रमांक- ३२
दिनांक- १८.२.२०१० विभाग- मुख्य लेखापरिक्षण
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/९१/१० दि.८/२/२०१०

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६६८ विषय क्रमांक- ३४
दिनांक- १८.२.२०१० विभाग- प्रशासन
सुचक- मा.ज्ञानेश्वर भालेराव अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशासन/६/कावि/७७/१० दि.८/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ५ चे स्पष्टीकरण (आठ) नुसार परिविक्षाधिन कालावधीतील अटी-शर्तीनुसार सेवा समाप्त करणे, ही शिक्षा ठरत नाही. त्यानुसार श्री.अनिल कालिदास शेंद्रे यांची सेवा समाप्तीची कार्यवाही आयुक्तांचे अधिकारात झालेली असुन ती योग्य असल्यामुळे श्री.शेंद्रे यांच्या विनंती अर्जातील सेवा समाप्तीचा आदेश रद्द करण्याची मागणी फेटाळण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६६९ विषय क्रमांक- ३५
दिनांक- १८.२.२०१० विभाग-वैद्यकिय
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/१२१/१० दि.८/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपा कार्यक्षेत्रातील चिखली, किवळे, दिघी, पुनावळे, चऱ्होली, बोपखेल या ठिकाणी नव्याने प्रस्तावित दवाखान्यांसाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे निवड यादी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना प्रतिमहा र.रू.१०,०००/- [र.रू.दहा हजार] एकत्रित मानधनावर ६-६ महिने कालावधीसाठी [वैद्यकीय अधिकारी] नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६७० विषय क्रमांक- ३७
दिनांक- १८.२.२०१० विभाग- वायसीएमएच
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/ॲकॅड/कावि/३२/१० दि.८/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाची गरज विचारात घेऊन डॉ.जे.एस.महाजन-सर्जन यांस दि.६/३/२००९ ते ३१/१/२०११ या कालावधीकरीता मानसेवी विशेषज्ञ म्हणून नेमणूक देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१०६७१ विषय क्रमांक- ३८
दिनांक- १८.२.२०१० विभाग-नगररचना व विकास
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/४अ४/९/१० दि.८/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मौजे ताथवडे या गावाच्या अतिरिक्त क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्यासाठी इरादा जाहीर करण्याची नोटीस प्रसिध्द झालेल्या मराठी मधील दैनिक सकाळ व इंग्रजी मधील दैनिक द.टाईम्स ऑफ इंडीया यांचे वृत्तपत्रातील व्यावसायिक जाहीरातीचे एकूण बिल र.रू. १,०३,४००/- [र.रू.एक लाख तीन हजार चारशे] अदा करणे आवश्यक असलेने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१०६७२ विषय क्रमांक- ३९
दिनांक- १८.२.२०१० विभाग-माध्यमिक
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/सं.अ/कावि/१८/१० दि.१०/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पं.डॉ.नंदकिशोर कपोते, मानद सल्लागार यांना दि.१३/३/२०१० पासून पुढील ६ महिने कालावधीसाठी र.रू.१५,०००/- प्रति महा मानधन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६७३ विषय क्रमांक- ४०
दिनांक- १८.२.२०१० विभाग- जनतासंपर्क व स्वागत कक्ष
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जस/३/कावि/२५/१० दि.१०/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

वृत्तपत्रे आणि साप्ताहिकांच्या पुणे जिल्ह्याची शासनमान्य वाढीव दराची यादी प्राप्त झाली असून त्यानुसार ज्या वृत्तपत्रांची दरवाढ झालेली आहे त्या वृत्तपत्रांना दि.३१ ऑगस्ट २००९ पासून सुधारीत शासन दराने फरक बिले अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६७४ विषय क्रमांक- ४१
दिनांक- १८.२.२०१० विभाग-औद्योगिक प्रशिक्षण केंद्र
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.औप्रके/०२/कावि/८५/१० दि.९/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

Stress Realese Foundation यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणार्थी गुणवत्ता व आत्मविश्वास या प्रशिक्षणासाठी येणाऱ्या र.रू.१२,०००/- [र.रू.बारा हजार] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६७५ विषय क्रमांक- ४२
दिनांक- १८.२.२०१० विभाग- विद्युत
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विद्युत/नि/१अ/कावि/२८/१० दि.८/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.९/०९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, YCM रूग्णालयातील शस्त्रक्रिया कक्ष, ICU स्टेपडाऊन ICU वॉर्डकरिता UPS बसविणेकामी मे.संदिप इंजिनियरिंग (नि.र.रू.४९,९९,९२५/- [र.रू.एकोणपन्नास लाख नव्यान्नव हजार नऊशे पंचवीस] पेक्षा १८.७८ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१०६७६ विषय क्रमांक- ४३
दिनांक- १८.२.२०१० विभाग- प्राध्यापक रामकृष्ण मोरे सभागृह
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.प्रेक्षा/कावि/१४/१० दि.१०/२/२०१०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मे.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा संस्था, पिंपरी यांना चिंचवड प्रेक्षागृहातील ११ महिने कालावधी साठी र.रू.१८५=५० प्रति प्रयोग या दराने व्दार पालन सेवा ठेका देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६७७ विषय क्रमांक- ४४
दिनांक- १८.२.२०१० विभाग- नगरसचिव
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/१९४/१० दि.१०/२/२०१०

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६७८ विषय क्रमांक- ४५
दिनांक- १८.२.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/जा/१०९/१० दि.९/२/२०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मुख्य अग्निशामक केंद्र संततुकारामनगर पिंपरी येथे EPABX टेलिफोन यंत्रणा नव्याने बसविणेचे काम निशांत इले.यांचेकडून अंदाजपत्रकीय र.रू.४९,९८७/- पेक्षा १ % कमी दराने करून घेण्यास व प्रत्यक्ष होणाऱ्या र.रू.४६,२०६/- [र.रू. शेहचाळीस हजार दोनशे सहा] खर्चास करारनामा करून काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६७९ विषय क्रमांक- ४६
दिनांक- १८.२.२०१० विभाग- वैद्यकीय
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/७/कावि/३८०/१० दि.११/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन-

M/s. Amruta Technologies Pvt Ltd, Kochi यांनी Software Development, Customization, Warranty Support period (Unlimited users for all hospitals and despensaries of PCMC) Basic computer and system training, PACS software, hardwares: Server, bar code reader, medical card generation machine, SAN storage, DVD writer, DICOM converters, Blade server chasis etc. Infrastructure for Setting hardware network within YCMH या सर्व बाबी करीता र.रू.४,७५,३१,१४०/- [र.रू.चार कोटी पंच्याहत्तर लाख एकतीस हजार एकशे चाळीस] खर्च अपेक्षित असल्याने प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे हेल्थ केअर मेनेजमेंट सिस्टिम चे कामकाज M/s. Amruta Technologies Pvt Ltd, Kochi यांच्याकडून करून घेण्यासाठी येणाऱ्या खर्चास व करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६८० विषय क्रमांक- ४७
दिनांक- १८.२.२०१० विभाग- क प्रभाग विद्युत
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भः-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/वि/९६/१० दि.१०/२/२०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या क प्रभाग विद्युत विभाग कार्यक्षेत्रा अंतर्गत लघुदाब वीजसंच मांडणीच्या निरीक्षणापोटी मा.विद्युत निरीक्षक, पुणे यांना निरीक्षण फी र.रू.१७,७४०/- [र.रू.सतरा हजार सातशे चाळीस] (सन २००९-१० करीता) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६८१ विषय क्रमांक- ४८
दिनांक- १८.२.२०१० विभाग-स्थापत्य
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/३९२/१०दि.११/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.४४ यमुनानगर मधील महिला व बालकल्याण इमारतीवर दुसरा मजला बांधणेकामी मे.एच.एम. कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१७,६२,६६५/- [र.रू.सतरा लाख बासष्ट हजार सहाशे पासष्ट] पेक्षा २०.७९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१३,९६,२०७/- [र.रू.तेरा लाख शहान्नव हजार दोनशे सात] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६८२ विषय क्रमांक- ४९
दिनांक- १८.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/८१/१० दि.११/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.११ अन्वये, वॉर्ड क्र.३३ खराळवाडी मधील सोनारूपा बिल्डींग जवळील जुने संडास ब्लॉक पाडून नवीन दुमजली संडास ब्लॉक बांधणेकामी मे.अशपाक सत्तार शेख (नि.र.रू. २३,३४,०००/- [र.रू.तेवीस लाख चौतीस हजार] पेक्षा ९.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. २१,००,८३३/- [र.रू.एकवीस लाख आठशे तेहतीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०६८३ विषय क्रमांक- ५०
दिनांक- १८.२.२०१० विभाग- स्थापत्य/पूलप्रकल्प
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/पूलप्रकल्प/३/२०१० दि.१७/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

नाशिक फाटा जंक्शन येथे नदी, रेल्वे व महामार्ग इ. ना ओलांडणारा पुल बांधणे (JNNURM-SUTP अंतर्गत BRTS मार्ग). याकामाची प्राप्त निविदांचा विचार करता मे.बी.जी.शिर्के क.टे.प्रा.लि.-व्ही.एम.सी.कं.प्रा.लि. (जे.व्ही.) यांची निविदा (lump sum - एकवट) सर्वात कमी दराची म्हणजेच र.रू.९८,८१,१६,९२१/- इतक्या दराची असून (कामाची मुळ निविदा र.रू.९३ कोटी आहे) त्यामुळे मे.बी.जी.शिर्के क.टे.प्रा.लि. -व्ही.एम.सी.कं.प्रा.लि.(जे.व्ही.) यांची निविदा प्रस्तावात नमूद शर्तीनुसार स्विकृत करण्याकामी जागतिक बँकेकडे शिफारस करण्यास व जागतिक बँकेकडून प्राप्त होणाऱ्या ना हरकत पत्र प्रमाणे निविदा स्विकृत करून करारनामा करून कामाचा आदेश आयुक्त यांनी देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६८४ विषय क्रमांक- ५१
दिनांक- १८.२.२०१० विभाग-आकाशचिन्ह व परवाना
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/८/कावि/३३४/१० दि.१७/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

रोटरडॅम, नेदरलँड येथील दौऱ्यामध्ये सर्व देशामधील JNNURM अंतर्गत बक्षिसपात्र शहरांचे मा.महापौर उपस्थित राहणार असून राज्य शासनाने त्यांचेकडील पत्र क्र.इएसटी-१०१०/२१९/प्र.क्र.१०/नवि-३ (आस्था) नगरविकास विभाग, मंत्रालय दि.९ फेब्रुवारी २०१० अन्वये या दौऱ्यास उपस्थित राहण्यासाठी मान्यता दिलेली असल्याने उक्त विषयपत्रात नमुद केलेल्या ठिकाणी मा.महापौर यांचे परदेश दौऱ्यास व त्याकामी होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६८५ विषय क्रमांक- ५२
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.गणेश भोंडवे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१०५३८ दि.५/२/२०१० मध्ये "चे खर्चास" या मजकूरा नंतर "तसेच सदरचे दराने व अटी शर्तीनुसार आणखी दोन वर्षे कालावधी

करीता संगणक यंत्रणा देखभाल व दुरुस्तीचे काम करून घेण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास" हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६८६ विषय क्रमांक- ५३
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने जे.एन.यु.आर.एम. अंतर्गत ३ मोठे व २ छोटे रोड स्वीपर खरेदी केले असून मे.यशोमंगल ही सुशिक्षित बेरोजगार तरूणांची संस्था असल्याने त्यांस नियमानुसार थेट पध्दतीने काम देता येत असले तरीही महापालिकेचे आर्थिक हित विचारात घेता व कामाची तातडी विचारात घेता सदर स्वीपरच्या चालन, देखभाल, दुरुस्तीचे काम निविदा नोटीस क्र.७/अ/२००७-०८ चे मंजूर लघुत्तम निविदा दरापेक्षा ५ % कमी दराने मे.यशोमंगल या नोंदणीकृत संस्थेस पुढील ५ वर्षाच्या कालावधीसाठी (प्रतिवर्षी १० % वाढ देण्याच्या अटीवर) देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६८७ विषय क्रमांक- ५४
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने ४ जेटिंग गाड्या ड्रेनेज सफाईसाठी खरेदी केल्या असून मे.यशोमंगल ही सुशिक्षित बेरोजगार तरूणांची संस्था असल्याने त्यांस नियमानुसार थेट पध्दतीने काम देता येत असल्याने मे.यशोमंगल या संस्थेस सदर गाड्यांच्या चालन, देखभाल, दुरुस्तीकामी ३,००० लिटर क्षमतेच्या वाहनासाठी र.रू. ७,०००/- प्रति ८ तासांच्या शिफ्टसाठी, ६,००० लीटर्स क्षमतेच्या वाहनासाठी र.रू. ९,०००/- प्रति ८ तासांच्या शिफ्टसाठी व ८,००० लीटर्स क्षमतेचे सक्शन-कम-जेटिंग मशिनसाठी र.रू.१२,०००/- प्रति ८ तासांच्या शिफ्टसाठी या दराने पुढील ५ वर्षे कालावधीसाठी (प्रतिवर्षी १० % वाढ देण्याच्या अटीवर) येणारा पावसाळा व कामाची तातडी विचारात घेता निविदा न मागविता तथापी करारनामा करून देणेस व याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६८८ विषय क्रमांक- ५५
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

सालाबादाप्रमाणे कामगार कल्याण विभागामार्फत मनपा आस्थापनेवरील महिला कर्मचाऱ्यासाठी ८ मार्च हा महिला दिनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो यावर्षीही महिला दिन साजरा करणेकामी र.रू.१,००,०००/- [र.रू.एक लाख] अपेक्षित खर्च असून कार्यक्रम आयोजनास व होणाऱ्या खर्चास व होणारा खर्च हा कामगार कल्याण विभागाकडील सांस्कृतिक कार्यक्रम या लेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६८९ विषय क्रमांक- ५६
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

ड प्रभाग विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांचे सन ०८-०९ चे सार्वजनिक सुट्यांचे वेतन अदा करणेकामी स्थायी आस्थापना या शिर्षकामध्ये तरतूद कमी पडत असल्यामुळे वीज बिल या लेखाशिर्षकातील र.रू.१०,००,०००/- स्थायी आस्थापना मध्ये वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९० विषय क्रमांक- ५७
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

खाली नमूद केलेल्या व्यक्तींस त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदी व मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | नांव | पद | र.रु. |
|---|---|---|---|
| १) | मयुर सुरेश जगदाळे | कॉम्प्युटर ऑपरेटर | ७०००/- |
| २) | चवरे अभिजित ज्ञानदेव | समुह संघटक | ८०००/- |
| ३) | शिला रामचंद्र आस्वाडे (RGNM) | नर्स | ८०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९१ विषय क्रमांक- ५८

दिनांक- १८.२.२०१०

सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे

संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

बालाजीनगर झोपडपट्टीची जागा एम.आय.डी.सी.ची होती ती जागा आता मनपाकडे हस्तांतरीत झाली असून सदर झोपडपट्टीतील लोकसंख्या दहा हजार पर्यंत असून तेथे शाळा नसलेने व मोकळ्या जागेत झोपडपट्टी वाढण्यापेक्षा सदर जागेत शाळा बांधण्याकामी दयानंद शिक्षण भोसरी यांना ती जागा विनामोबदला उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९२ विषय क्रमांक- ५९

दिनांक- १८.२.२०१०

सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे

संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१०४७७, दि.२/२/२०१० नुसार, राष्ट्रीयकृत बँके कडील बँक गॅरंटी याऐवजी राष्ट्रीयकृत किंवा अनुसुचीत [schedul] बँकेकडील बँक गॅरंटी घेवून ७५ % आगावू रक्कम अदा करून कॉम्पॅक्टर विद व्हेईकल युनीट खरेदी करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९३ विषय क्रमांक- ६०

दिनांक- १८.२.२०१०

सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे

संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

उपद्रव शोध पथकाकरीता लागणारे वाहन प्रति दिवशी र.रू.१,७००/- दराने श्री.सोनाजी देवराम प्रधान यांचे टाटा ७०९ ट्रक दोन मजूर व एक वाहन चालक, एक शिडी, यांच्यासह वाहन (वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.००) दोन वर्षासाठी सध्याचे मनपा अटी व शर्तीनुसार भाड्याने घेणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९४ विषय क्रमांक- ६१
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

१)मनपा सिमेंट गोडाऊन २)कचरा वाहतूक क प्रभाग ३)वाहन दुरुस्ती कार्यशाळा ४)गवळीमाथा पाईप भांडार ५)जलशुध्दीकरण केंद्र से.२३ या संवेदनशील मिळकतीवर ट्रेंड डॉग हॅंडलरसह सुरक्षा व्यवस्थेसाठी मे.सत्यश्री एंटरप्रायजेस यांना प्रत्येक डॉग व सोबत दोन हॅंडलर (१२ + १२ तास) २४ तास करीता प्रतिमहा र.रू. १५,०००/- + सर्व्हिस टॅक्स प्रत्येकी या प्रमाणे एकूण पाच मिळकतीवर व आवश्यकते प्रमाणे इतरत्र दि.२३/३/१० पासून पुढील एक वर्ष कालावधीकरीता येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९५ विषय क्रमांक- ६२
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

वॉर्ड क्र.४८ मध्ये ८ मार्च जागतिक महिला दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करणेस, त्याकामी मंडप, स्पीकर, लाईट व अनुषंगिक व्यवस्था निविदा न मागविता थेट पध्दतीने करणेस ह्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९६ विषय क्रमांक- ६३
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

फुगेवाडी जुना जकात नाका येथील १० x १५ ची जागा नाममात्र भाड्याने डॉ.बाबा आढाव यांचे हमाल पंचायत कार्यालयासाठी २१ वर्ष कालावधी करीता भाड्याने देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९७ विषय क्रमांक- ६४
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव

मनपाच्या इंद्रायणीनगर सेक्टर नं.१ भोसरी येथील बॅडमिंटन हॉल भाडेकरारा नुसार राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र या संस्थेस पाच वर्षे मुदतीकरीता चालविणेस देणेस तसेच सेक्टर नं.१ मधील शाळा सध्या चालवित असलेल्या राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र या संस्थेस पाच वर्षाची मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९८ विषय क्रमांक- ६५
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

मनपाच्या संगणक विभागामधून किंवा भांडार विभागाकडून किंवा ज्या विभागाकडे मनपाकडून पुरविणेत आलेले संगणकावर अधिकृत रित्या सॉफ्टवेअर असणेकरिता केंद्र शासनाची मान्यता असलेले मे.एस.ब्रेन सिस्टिमस् व सॉफ्टवेअर प्रा.लि., पुणे या संस्थेची नेमणूक मनपामधील डेस्कटॉप व लॅपटॉप यावर अधिकृत सॉफ्टवेअर त्यांचेकडील केंद्र शासनाने DGS & D नुसार मान्यता असलेले सॉफ्टवेअर मनपाच्या संगणकावर अधिकृत करणेकामी व त्याकामी असणाऱ्या खर्चास व सदर संस्थेचे कामाची मुदत संपणेच्या आत सदर काम करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०६९९ विषय क्रमांक- ६६
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
स्ंदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

दि.८ मार्च जागतिक महिला दिन मनपाच्या महिला व बालकल्याण समितीच्या मार्फत आयोजित करणे आवश्यक असल्याने यासाठी मनपाच्या चार प्रभागामध्ये विविध सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणेस व त्याकामी येणारे र.रू. १०,००,०००/- खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७००  विषय क्रमांक- ६७
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे  अनुमोदक- मा. मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

श्री.काळभोर आर.एन. क्रिडा मार्गदर्शक व श्री.गव्हाणे एन.टी. ग्राऊंडमन यांना पुढील ६ महिने कालावधीसाठी अनुक्रमे र.रू.४,०००/- व र.रू.२,५००/- एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेस व त्यांच्या मानधनापोटी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७०१  विषय क्रमांक- ६८
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.प्रशांत शितोळे  अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे, मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

स्थायी समिती ठराव क्र.१०५२३ दि.२/२/२०१० अन्वये मनपाच्या जलतरण तलावांवर जीवरक्षक पुरविणेकामी जॉय स्पोर्टस क्लब पिंपळेगुरव यांना जीवरक्षक पुरविणेकरिता मंजुरी देणेत आली असून सदर प्रस्ताव रद्द करून त्याऐवजी राष्ट्रीय लाईफ सेविंग सोसायटी ऑफ इंडीया या संस्थेचे जीवरक्षक म्हणून प्रमाणपत्र असलेल्या जीवरक्षक पुरवठा करू शकणाऱ्या न्यु.जॉय स्पोर्टस क्लब सांगवी या संस्थेस मनपाच्या ७ जलतरण तलावासाठी माहे मार्च ते जुन २०१० पर्यंत एकुण ३२ जीवरक्षक प्रति महा प्रति जीवरक्षक र.रू.७,०००/- [र.रू.सात हजार] या दराने उपलब्ध करून घेणेस तसेच सन २०१० पासून पुढील पाच वर्षाकरीता उन्हाळी व हिवाळी सिझन मध्ये मनपाच्या सर्व जलतरण तलावावर आवश्यक तितके जीवरक्षक प्रति वर्षी योग्य त्या मासिक मानधनावर नेमणूक करणेकरिता न्यु. जॉय स्पोर्टस क्लब सांगवी या संस्थेस पाच वर्षाकरिता नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७०२  विषय क्रमांक- ६९
दिनांक- १८.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ  अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१०६२६ दि.९/२/२०१० मध्ये “चे मा.ड प्रभाग” हा मजकूर वगळून त्याऐवजी “चे मा.क प्रभाग” हा मजकूर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली.

सुचक :- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा.राजेश पिल्ले

मंगळवार दिनांक २३/२/२०१० रोजी दु.१:४५ पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

---

मा.सभापती :- मंगळवार दिनांक २३/२/२०१० रोजी दुपारी १:४५ पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८